# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १९८ वा ❑ भारतीय सौर दिनांक ०३ आश्विन शके १९४८, शुक्रवार दि.२५ सप्टेंबर २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## भारताची डिजिटल क्रांती


– प्रा डॉ सुधीर अग्रवाल


**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

२०व्या शतकाच्या उत्तरार्धात सुरू झालेली माहिती तंत्रज्ञानाची क्रांती आज २१व्या शतकात एका अतिशय निर्णायक आणि प्रगत टप्प्यावर येऊन पोहोचली आहे. आजचे युग हे केवळ तंत्रज्ञानाचे राहिलेले नसून, ते प्रामुख्याने विदा (डेटा) आणि कृत्रिम प्रज्ञेचे युग बनले आहे. आपल्या दैनंदिन जीवनातील प्रत्येक क्षण आज इंटरनेट, स्मार्टफोन, समाजमाध्यमे, ५जी नेटवर्क आणि अद्ययावत क्लाऊड प्रणालीशी जोडला गेला आहे. या सर्व प्रक्रियांमधून जगभरात दररोज निर्माण होणाऱ्या माहितीचा वेग आणि आकार इतका प्रचंड आहे की, तो साठवण्यासाठी आणि त्यावर अतिशय वेगाने प्रक्रिया करण्यासाठी जागतिक दर्जाच्या आणि अत्यंत भक्कम विदा केंद्रांची (डेटा सेंटर) नितांत आवश्यकता असते. याच अनुषंगाने, आगामी काळात भारतात विदा केंद्रांचे जाळे अतिशय वेगाने विस्तारणार असून, यामध्ये महाराष्ट्राची आर्थिक राजधानी मुंबई आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रणी शहर पुणे, ही दोन्ही शहरे मिळून एक मुख्य विदा केंद्र कॉरिडॉर म्हणून जागतिक पातळीवर आपला ठसा उमटवणार आहेत. कुशमॅन अँड वेकफिल्ड या आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेल्या ख्यातनाम संस्थेने नुकत्याच जाहीर केलेल्या जानेवारी ते जून या पहिल्या सहामाहीच्या अहवालातून, या क्षेत्रातील भारताची प्रचंड झेप आणि महाराष्ट्राचे वर्चस्व अतिशय ठळकपणे समोर आले आहे.

कुशमॅन अँड वेकफिल्ड संस्थेच्या या विस्तृत अहवालानुसार, देशातील विदा केंद्र परिसंस्थेचा अतिशय वेगाने विस्तार होत आहे. देशात सध्या एकूण १४७ विदा केंद्रे कार्यरत असून, ती चालविणाऱ्या ३३ प्रमुख सेवा पुरवठादार कंपन्या आहेत. या वर्षीच्या पहिल्या सहामाहीत देशाची एकूण विदा केंद्र क्षमता १,७८९ मेगावॅट या महत्त्वपूर्ण टप्प्यावर पोहोचली आहे. विशेष म्हणजे, केवळ या ६ महिन्यांच्या कालावधीतच देशात १७८ मेगावॅट क्षमतेची नवीन भर पडली आहे. सध्याच्या घडीला व्यवसायांचे वेगाने होणारे डिजिटायझेशन आणि सरकारी पातळीवर राबवण्यात येणारे डिजिटल इंडियासारखे उपक्रम लक्षात घेता, या क्षमतेत आगामी काळात अभूतपूर्व वाढ होणार आहे. अहवालानुसार, २०३० सालापर्यंत देशात आणखी तब्बल ३,८६० मेगावॅट क्षमतेच्या विदा केंद्रांचा पुरवठा होणार आहे. यापैकी ५०९ मेगावॅट क्षमतेच्या केंद्रांची उभारणी सध्या प्रत्यक्ष सुरू आहे, तर उर्वरित ३,३५१ मेगावॅट क्षमतेची केंद्रे नियोजनाच्या अंतिम टप्प्यावर आहेत. याचाच अर्थ, येत्या काही वर्षांत देशाच्या विदा केंद्र क्षमतेत दुपटीहून अधिक वाढ होणार असून, ही वाढ भारतीय अर्थव्यवस्थेला नवी दिशा देणारी ठरेल.

या संपूर्ण प्रगतीमध्ये देशात सर्वाधिक विदा केंद्र क्षमता सध्या एकट्या मुंबईत केंद्रित आहे आणि ती आघाडीवर आहे. पहिल्या सहामाहीत मुंबईतील कार्यान्वित क्षमता ८९० मेगावॅट एवढी असून, आगामी काळात त्यात आणखी १,७२६ मेगावॅटची भर पडणार आहे. मुंबईला मिळणाऱ्या या विशेष पसंतीमागे अनेक भौगोलिक आणि तांत्रिक कारणे आहेत. मुंबई हे भारताचे प्रमुख लँडिंग स्टेशन आहे. म्हणजेच, भारताला संपूर्ण जगाशी जोडणाऱ्या समुद्राखालून जाणाऱ्या बहुतांश फायबर ऑप्टिक केबल्स मुंबईत येतात. यामुळे मुंबईत जागतिक स्तरावरील इंटरनेटचा वेग आणि कनेक्टिव्हिटी अतिशय जलद आणि दर्जेदार आहे. याव्यतिरिक्त, भक्कम डिजिटल पायाभूत सुविधा, अखंडित ऊर्जेची मुबलक उपलब्धता आणि दळणवळणाच्या उत्तम सुविधा यामुळे बहुतांश आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञान कंपन्यांची मुंबई ही पहिली पसंती असते. मुंबईतील जागेची कमतरता आणि वाढते दर पाहता, बहुतांश आंतरराष्ट्रीय कंपन्यांनी मुंबईला सक्षम पर्याय म्हणून पुण्याकडे आपला मोर्चा वळवला आहे. त्यामुळे पुण्याची विदा केंद्र क्षमता अतिशय वेगाने वाढत आहे. सध्या पुण्याची विदा केंद्र क्षमता १३३ मेगावॅटवर पोहोचली असून, आगामी काळात तेथे २५८ मेगावॅट क्षमतेच्या नवीन अद्ययावत केंद्रांचा पुरवठा होणार आहे. पुण्याची बलस्थाने अनेक आहेत. इतर महानगरांच्या तुलनेत पुण्यात विदा केंद्रे उभारण्यासाठी आवश्यक असलेली प्रशस्त जागा कमी किमतीत उपलब्ध आहे. याशिवाय, पुणे हे देशातील एक प्रमुख शैक्षणिक आणि माहिती तंत्रज्ञान हब असल्यामुळे, या केंद्रांच्या देखभालीसाठी आणि कार्यान्वयनासाठी आवश्यक असलेले तांत्रिकदृष्ट्या कुशल मनुष्यबळ पुण्यात मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. जागतिक पातळीवरील कंपन्यांचा विस्तार होत असताना, त्यांना आवश्यक असणाऱ्या सर्व सोयीसुविधा पुण्यात सहज उपलब्ध होत असल्याने, पुण्याकडे आंतरराष्ट्रीय गुंतवणुकीचा ओघ सातत्याने वाढत आहे.

विदा केंद्रांच्या या प्रचंड विस्तारामागे मुख्यत्वे २ मोठे तांत्रिक बदल कारणीभूत आहेत – क्लाऊड तंत्रज्ञानाचा वाढता स्वीकार आणि कृत्रिम प्रज्ञेचा वाढता वापर. कुशमॅन अँड वेकफिल्डचे कार्यकारी व्यवस्थापकीय संचालक गौतम सराफ यांनी या अहवालाच्या निमित्ताने अतिशय मार्मिक मत व्यक्त केले आहे. त्यांच्या मते, देशातील विदा केंद्र परिसंस्था अतिशय वेगाने विस्तारत आहे. सध्या केवळ खाजगी व्यवसायच नाही, तर बँकिंग, शिक्षण, आरोग्यसेवा आणि सरकारी कामकाजातही क्लाऊड प्रणालीचा वापर अनिवार्य बनला आहे. कंपन्या आपला डेटा स्वतःच्या सर्व्हरवर ठेवण्याऐवजी तो सुरक्षित क्लाऊडवर ठेवण्यास प्राधान्य देत आहेत. यासोबतच, अर्थव्यवस्थेच्या पुढील टप्प्यातील वाढीसाठी कृत्रिम प्रज्ञेचा वापर आणि विदा आधारित विकास या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या ठरणार आहेत. कृत्रिम प्रज्ञा मॉडेल्सना प्रशिक्षित करण्यासाठी अब्जावधी डेटा पॉईंट्सवर क्षणार्धात प्रक्रिया करण्याची आवश्यकता असते. ही प्रचंड ताकद केवळ अद्ययावत विदा केंद्रेच देऊ शकतात. भविष्यातील प्रगतीचा मुख्य आधार हा विदा असणार आहे आणि या संपूर्ण तंत्रज्ञानाचा गाभा ही विदा केंद्रेच असणार आहेत. या परिसंस्थेच्या मजबुतीवरच देशाची इतर सर्व तांत्रिक प्रगती अवलंबून राहील.

डिजिटल अर्थव्यवस्थेची गगनचुंबी इमारत ज्या भक्कम पायावर उभी राहणार आहे, तो पाया म्हणजे ही विदा केंद्र परिसंस्था होय. मुंबई आणि पुणे या २ शहरांमधील भौगोलिक जवळीक, दळणवळणाच्या उत्तम सुविधा आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील आधीच झालेली मोठी प्रगती यामुळे हा संयुक्त विदा केंद्र कॉरिडॉर अतिशय वेगाने विकसित होत आहे. याचा दूरगामी परिणाम केवळ तंत्रज्ञान क्षेत्रावर होणार नसून, तो राज्याच्या आणि देशाच्या अर्थव्यवस्थेवरही अत्यंत सकारात्मक होईल. विदा केंद्रांच्या उभारणीमुळे बांधकाम क्षेत्र, देखभाल, सायबर सुरक्षा, प्रगत कुलिंग सिस्टीम्स, नेटवर्किंग आणि ऊर्जा व्यवस्थापन यांसारख्या अनेक क्षेत्रांमध्ये हजारो नवीन थेट आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होतील. तसेच, अनुषंगिक उद्योगांनाही याचा मोठा फायदा होईल. थोडक्यात सांगायचे तर, कृत्रिम प्रज्ञा आणि क्लाऊड तंत्रज्ञानाच्या या नव्या युगात भारत जगाचे नेतृत्व करण्यासाठी सज्ज होत आहे. या अत्यंत महत्त्वाच्या प्रवासात मुंबई–पुणे विदा केंद्र कॉरिडॉर केवळ भारताचाच नव्हे, तर संपूर्ण आशिया–प्रशांत क्षेत्रातील एक प्रमुख केंद्र म्हणून उदयास येईल. आगामी काळात या २ शहरांची जोडी जागतिक तंत्रज्ञानाच्या नकाशावर महाराष्ट्राची आणि भारताची ओळख अधिक ठळक करेल आणि देशाला खऱ्या अर्थाने एक जागतिक डिजिटल महासत्ता बनवेल.

# पर्यावरणपूरक ५१ वैविध्यपूर्ण गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना !

## आकाश शिंदे यांच्या घरातील गणेशोत्सव ठरला आकर्षण

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

छत्रपती संभाजीनगर – पर्यावरणाचे भान बाळगत दरवर्षी ५१ गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करून गणेशोत्सव साजरा करण्याची परंपरा शिंदे कुटुंबीयांनी कायम ठेवली आहे. प्रत्येक गणेशमूर्ती वेगळी आणि आकर्षक आहे. शिंदे यांच्या घरातील गणेशोत्सव परिचितांसाठी आकर्षण ठरला आहे.

गणेशोत्सव वेगवेगळ्या पद्धतीने साजरा करण्याची परंपरा आहे. घरगुती किंवा सार्वजनिक गणेश उत्सवात पर्यावरणाचे भान बाळगणारे अनेकजण आहेत. शहरातील अभियंता आकाश शिंदे यांच्या घरातील गणेशोत्सव असाच आगळा–वेगळा आहे.

**शाडूमातीच्या मूर्ती**

बजाजनगर येथील रहिवासी शिंदे कुटुंब गेली १४ वर्षे घरात तब्बल ५१



गणपती मूर्तींची प्रतिष्ठापना करतात. एवढ्या गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करणारे हे एकमेव कुटुंब आहे. विशेष म्हणजे पर्यावरणपूरक शाडू मातीपासून मूर्ती तयार करतात. शिंदे यांच्या कुटुंबात पहिला गणपती मातीचाच बसवला गेला होता. २०१३ पासून या उत्सवाला सुरुवात झाली आणि ५१ गणपती बसवण्याची परंपरा सुरू आहे.

आतापर्यंत वेगवेगळ्या ७१४ शाडू मातीच्या गणपतीची निर्मिती आणि स्थापना केली आहे. प्रत्येकवर्षी गणपतीची नवीन रूपे पहायला मिळतात. प्रत्येकाचे रंग, रूप, आकार वेगवेगळे असतात, असे शिंदे यांनी सांगितले.

**ऊर्जादायी गणेशोत्सव**

गणपती तयार करण्यासाठी साधारण आठ ते दहा दिवस लागतात. सर्व कुटुंबीय सहभागी होऊन उत्सव साजरा करतात. आकाश यांच्यासह त्यांची पत्नी डॉ. अर्चना शिंदे, वडील कैलास शिंदे आणि आई सुनीता शिंदे सहभाग घेतात. शाडू मातीच्या मूर्तीमुळे पर्यावरण संतुलनासाठी मदत होतेच, शिवाय मिळणारा आनंद आणि गणपतीची आराधना वर्षभरासाठी प्रचंड ऊर्जा देते, असे शिंदे कुटुंबाने सांगितले.

# राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाची संस्कार शाळा-डॉ. गणेश भामे

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

सासवड – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या वाघीरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना संचालक प्रा. डॉ. गणेश भामे यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये सेवाभाव, सामाजिक बांधिलकी, नेतृत्वगुण आणि राष्ट्रनिर्मितीची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमास सुमारे १५० स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य तथा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. नितीन घोरपडे होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. संजय झगडे आणि वाणिज्य विभागाचे समन्वयक डॉ. नरसिंग गिरी



उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना डॉ. गणेश भामे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. स्वच्छता अभियान, वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धन, रक्तदान, आरोग्य जनजागृती, ग्रामविकास, सामाजिक प्रबोधन, व्यसनमुक्ती, आपत्ती व्यवस्थापन आदी उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

''राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाची संस्कारशाळा आहे. सेवाभाव, नेतृत्व, शिस्त, संघभावना आणि सामाजिक संवेदनशीलता या मूल्यांचा विकास तिच्या माध्यमातून होतो. या मूल्यांचा विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनात अंगीकार करावा,'' असे डॉ. भामे यांनी सांगितले.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे यांनी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांच्या कार्याचे कौतुक केले. ''आपल्याला सहकार्य करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची जाणीव ठेवून मनापासून आभार मानणे म्हणजे खऱ्या अर्थाने माणुसकीची जाणीव ठेवणे होय. सहकार्य करणाऱ्यांच्या योगदानाची जाणीव ठेवून त्यांना धन्यवाद देणे, हाच राष्ट्रीय सेवा योजना दिनाचा खरा संदेश आहे. आजच्या दिनाचे औचित्य साधून आपण सर्व पन्नास व्यक्तींना धन्यवाद म्हणून आजचा दिवस साजरा करूयात असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. शुभम ठोंबरे यांनी केले. प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी डॉ. शीतल कल्हापुरे, प्रा. शुभम ठोंबरे, डॉ. किरण गाढवे आणि प्रा. पूनम काळे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, सहकारी प्राध्यापक आणि प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते. प्रा. पूनम काळे यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. शीतल कल्हापुरे यांनी आभार मानले.

# केसांचा रंग आणि घरातील अधिकार

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

वय वाढत जाते, केसांचा काळा रंग हळूहळू पांढरा होतो. मग त्याला डाय करून हवा तो रंग ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. ते लपवता येण्यासारखे नसते.

चेहऱ्यावर सुरकुत्या येतात, चालण्याचा वेग मंद होतो आणि शरीर पूर्वीसारखे साथ देत नाही. पण मन मात्र अजूनही तेच असते. लहान मुलांसारखे, तारुण्यातील बहरसारखे....

आपल्या माणसांसाठी काळजी करणारे, घरासाठी निर्णय घेणारे आणि आपली माणसे सुखी राहावीत अशी मनापासून इच्छा बाळगणारे.

कधी काळी घरातील प्रत्येक निर्णयात त्यांचे मत विचारले जायचे. किंवा आपले विचार शिस्त घरावर लादणारे सुद्धा मन होते.

मुलांच्या शिक्षणापासून त्यांच्या लग्नापर्यंत, घर बांधण्यापासून आर्थिक नियोजनापर्यंत त्यांचा शब्द महत्त्वाचा असायचा. त्यांच्या अनुभवाला घरात वजन असायचे.पण..... पण काळ बदलतो केसांचा रंग जातो तसा घरातील अधिकारही नकळत कमी होत जातो. वयोवृद्धाच्या शब्दांना मान फार कमी मिळतो.

पूर्वी, ''बाबा म्हणतात म्हणजे बरोबर असेल,'' असे मानणारी मुले मोठी होतात. स्वतःचे निर्णय घेऊ लागतात. त्यात काही चुकीचे नाही. प्रत्येक पिढीला स्वतःच्या पद्धतीने जगण्याचा अधिकार आहे. मात्र या बदलात एक गोष्ट हरवू नये.वृद्ध माणसाचा सन्मान हरवू देवू नये. त्यांना विचारा हे योग्य आहे का? नसेल तर



त्यांना स्पष्ट सांगा की इथे हे विचार जमत नाहीत आपण दुसरा विचार करूया पण गोडीत सांगावे.

''तुम्हाला आता काय कळतं?''

''तुमच्या काळात असं होतं'' ''तुम्ही यात पडू नका'' अशी वाक्ये कदाचित सहज बोलली जातात; पण ती वृद्ध मन आतून खूप दुखावतात. त्यांच्या मनाला या गोष्टी लागून जातात आपण इतक्या वर्ष सगळं केलं आणि आता आपल्याला कळत नाही अशी म्हणणारी आपलीच मुलं त्यांच्या मनाला पोखरून जातात.... त्यांचे मन उदास होते. पुढे काय मग ते निःशब्द होत जातात आणि मनातले मनात विचार करत व पुढील आजारांना सामोरे जातात. त्यांचा एकटेपणा वाढतो. आता आपली गरज या घराला नाही असे वाटते. या घरातील माझे अस्तित्व संपले आहे आता यापुढे आपले काय??


लेखिका -
वसुधा वैभव नाईक,
पुणे. मो. 9823582116




अशा अनेक विचारांनी त्यांचे मन खात जाते.

फक्त काही गोष्टी पाळाव्यात...

प्रत्येक निर्णयामध्ये त्यांना विचारात घ्यावे.

जरी निर्णय पटला नाही तरी हे चांगलं नाही हे तोंडावर सांगू नये. गोड शब्दात त्यांना पटवून द्यावे.

प्रत्येक वयोवृद्ध आपल्या वेळी काय झाले हे विचारात घेतो. आणि असेच विचार प्रकट करत असतो.

हल्ली जमाना नवीन आहे तंत्रयुग आहे. या पद्धतीमध्ये बऱ्याच चांगल्या गोष्टी आहेत याचा वापर योग्य तो झाला... तर वयोवृद्धांना देखील त्रास होत नाही फक्त त्यांचे विचार विचारून कृती करावी.

त्यांना फक्त एवढेच वाटते की, ''माझे मत अजूनही महत्त्वाचे आहे.''

अधिकार कमी झाला तरी आपलेपणा कमी करू नये.जबाबदाऱ्या कमी झाल्या तरी आदर कमी होऊ नये. घराची सूत्रे पुढच्या पिढीने हातात घेतली तरी ज्यांनी हे घर उभे केले, त्यांच्या हातातील अनुभवाची शिदोरी विसरू नये. त्यांचे अनुभव देखील विचारात घ्यावेत आणि आपल्याला हवे ते करावे. दोघांचा समन्वय साधून केले तर अति उत्तम होते.

वय म्हणजे ओझे नाही. वृद्धत्व म्हणजे त्या व्यक्तीचा उपयोग संपणे असे नाही.

आणि पांढरे केस म्हणजे विचारांची किंमत संपणे तर अजिबातच नाही. त्या पांढऱ्या केसांमध्ये अनुभवांची खाण असते हे विसरता कामा नये.

घरातील ज्येष्ठ माणूस म्हणजे त्या घराच्या इतिहासाचे जिवंत पुस्तक असतो.

त्याच्या आठवणींमध्ये घराची मुळे असतात आणि अनुभवांमध्ये पुढच्या पिढीसाठी दिशा असते.

म्हणून घरातील अधिकाराचे हस्तांतरण होऊ द्या; पण सन्मानाचे हस्तांतरण कधीही होऊ देऊ नका....

कारण उद्या आपलेही केस पांढरे होतील

आपलाही आवाज थोडा मंद होईल

आपल्यालाही कुणीतरी म्हणेल, ''आता तुम्ही आराम करा.'' तेव्हा आपल्याला अधिकारापेक्षा अधिक गरज असेल ती एका प्रेमळ शब्दांची..

''तुम्ही आहात, म्हणून हे घर अजूनही घर आहे!''असे बोललात तर त्याना खूप आनंद होईल...

हीच तर जीवन संपत्ती आहे. अनुभव बोलत असतो.

आपल्या घरातील जेष्ठ, वयोवृद्ध माणसाची किंमत कधीच कमी होऊ देवू नका....



## जात्यावरच्या ओव्या......

बैलपोळ्याचा सण
पडा मारुतीच्या पाया
नंदी आला देवाचा
याला सुखाच ठेवा ||८५८||

बैलपोळ्याचा सण
हात जोडतो दोन्ही
शिवारातल्या देवा
ध्यान ठेवा तुम्ही ||८५९||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ७६




ज्योतिर्मय साहित्य

**नव्हे कर्म ना धर्म ना योग काही ।**
**नव्हे भोग ना त्याग ना सांग पाही ।**
**म्हणे दास विश्वास नामी धरावा ।**
**प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।।७६।।**

अर्थ : आपल्या हातून कर्म, धर्म किंवा योग यातील एकही गोष्ट व्यवस्थित होत नाही. माणूस पूर्णपणे भोगातही रमत नाही किंवा पूर्णपणे त्यागही त्याच्या हातून घडत नाही. अशा परिस्थितीत समर्थ म्हणतात नामावर विश्वास ठेवा. पहाटेच्या वेळी श्रीरामाचे चिंतन करा.

( त्याग -विरक्ती, सांग - यथासांग/व्यवस्थितपणे )



विवेचन : प्रभाते मनी राम चिंतीत जावा या श्लोकमालिकेतील हा शेवटचा श्लोक. या दहा श्लोकांच्या गटात समर्थांनी भगवंताच्या नामाचा महिमा निरनिराळ्या प्रकारे वर्णन केला आहे. प्रत्येक श्लोकाचा शेवट प्रभाते मनी राम चिंतीत जावा या ओळीने झाला आहे. या श्लोकांनी नामस्मरणाचे आणि प्रभात समयी श्रीरामाच्या चिंतनाचे महत्व आपल्या मनावर ठसवले आहे.

आपण प्रापंचिक माणसे. जसे जमेल तसे आपल्या वाट्याला आलेले कर्म करण्याचा प्रयत्न करीत असतो. परंतु मतमतांच्या गलबल्यात आपण एवढे हरवून किंवा गोंधळून जातो की हाती आलेल्या कर्माला व्यवस्थितपणे न्याय देणे आपल्याला जमत नाही. धर्मपालनाच्या बाबतीतही असेच होते. धर्मपालनासाठीच्या विविध गोष्टी, विविध मार्ग ऐकून सामान्य माणूस गोधळतो. मग हे करू की ते करू अशी त्याची अवस्था होते. योगाचा किंवा ध्यानधारणेचा अभ्यास करणे त्याला शक्य होत नाही. थोडक्यात सांगायचे तर सामान्य माणसाची स्थिती एक ना धड भाराभर चिंध्या या म्हणीप्रमाणे होते. लोकांची ही मानसिकता ओळखून त्यांची दिशाभूल करणारे बुवा, बाबा त्यांचे उखळ मात्र पांढरे करून घेतात. समर्थांसारखे सद्गुरू लोकांना अशा प्रकारच्या गोंधळाच्या स्थितीतून बाहेर काढण्याचे अचूक कार्य करतात. लोकांना सन्मार्गाची दिशा दाखवतात.

समर्थांच्या काळात तर सामान्य माणूस अशा गोंधळलेल्या स्थितीतच होता. तो कर्मकांडात अडकला होता. त्यामुळे ईश्वरप्राप्तीच्या खऱ्या मार्गापासून दूरच चालला होता. अशा वेळी समर्थ, संत तुकाराम आदी संतांनी लोकांना खरा धर्म काय आहे हे समजावून सांगितले. लोकांची परंपरा, अंधश्रद्धा आदींवर प्रहार करून त्यांना खरा ईश्वरभक्तीचा मार्ग दाखवला. समर्थांनी नामस्मरण हे सर्वात सोपे साधन आहे. त्यासाठी काही पैसा, वेगळा वेळ, शारीरिक श्रम या गोष्टी लागत नाहीत हे सांगितले. **(क्रमशः)**




## || संजय उवाच... ||



@संजय काव्या पुणे 7743918559

✍ चढ उतार

प्रत्येकाचा आयुष्यात चढ उतार येतातच, चढ उताराशिवाय आयुष्याची मजा नाही. सावलीचं महत्व उन्हाचे चटके बसले कि समजते, जो चढ व उतार दोन्हीमध्ये आपलं संतुलन ढळू देत नाही तोच या दोन्ही परिस्थितीत मजबूत रहातो.

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)

## नामाचे सूक्ष्म स्वरूप



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

नुसते 'राम राम' म्हणून राम कसा भेटेल हा प्रश्न माणूस सहजच विचारतो, आणि त्याला दाखला म्हणून म्हणतो की, समजा एखादा मनुष्य 'नोकरी नोकरी' असा जप करीत खोलीत बसला, तर त्याला नोकरी मिळणे शक्य आहे का ? वरकरणी हा दाखला अगदी बेमालूम दिसतो खरा, पण थोडासा विचार केला, तर तो इथे मुळीच लागू पडत नाही, असे कळून येईल. जो दाखला द्यायचा, आणि ज्या बाबतीत तो द्यायचा, त्यांचे गुणधर्म सारखे असावे लागतात. 'रामनाम' आणि 'नोकरी' यांचे परिणाम एकमेकांविरूद्ध आहेत. 'राम राम' म्हणण्याचा शेवट रामप्राप्तीत म्हणजे स्वत:च्या विस्मरणात होत असतो; म्हणजे देहबुद्धीतून देहाच्या पलीकडे जाणे, म्हणजे स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे, हा 'राम राम' म्हणण्याचा परिणाम. परंतु नोकरीचा प्रकार याच्या अगदी विरुद्ध आहे. मुळात नोकरी ही कल्पना सूक्ष्म आहे. नंतर, ती मिळावी म्हणून दहाजणांचे आर्जव करायचे, त्याच्यानंतर ती देणारा भेटायचा, आणि मग आपण ती नोकरी करायची. म्हणजे नोकरी या कल्पनेतून, सूक्ष्मातून, स्थूलात जाणे हा नोकरीचा प्रकार. पण ' राम राम ' म्हणणे हा प्रकार स्थूलांतून सूक्ष्माच्याही पलीकडे जाण्याचा आहे. यावरून, नोकरीचा हा दाखला इथे लागू पडत नाही हे स्पष्ट होते. दुसरी गोष्ट म्हणजे 'नोकरी नोकरी' असा जप करून नोकरी मिळणे कठीण हे तर खरेच, पण 'राम राम' म्हणून राम मिळणे कसे सोपे, किंबहुना कसे हमखास शक्य आहे हे पहा. नोकरी म्हणजे मुळात कल्पना असून, ती प्रत्यक्षात आणण्याकरिता इतर अनेक गोष्टींची कशी जुळवाजुळव करावी लागते, हे आपण आत्ताच पाहिले. तसेच, घर बांधणे ही कल्पना; ती पुरी करून ते घर सर्व बाजूंनी सुखसोयीचे आगर व्हावे या हेतूने सर्व जिनसा पैदा करून त्यात आणून ठेवणे, म्हणजेच कल्पनेतून कृतीत येण्याचा प्रकार झाला. आता हे करणे किती कष्टाचे आणि अनिश्चीत आहे याचा अनुभव सर्वांना आहे. 'राम राम' म्हणण्याचे उद्दिष्ट, स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे हे आहे; म्हणजेच, अगदी सर्व बाजूंनी परिपूर्ण आणि भरलेले घर एकेक वस्तू फेकून देऊन रिकामे करण्यासारखे आहे. ही गोष्ट करण्याची इच्छा असल्यास कोणालाही सहज होण्यासारखी आहे. तेव्हा 'नोकरी नोकरी' म्हणून नोकरी मिळणे जितके कठीण, तितकेच 'राम राम' म्हणून राम मिळणे निश्चीत आहे. सबब 'राम राम' म्हणून राम कसा भेटेल अशी शंका न घेता' राम राम' जपावे.

मनाच्या सर्व दु:खाला कारण देहबुद्धी आहे. ती जायला उपाय एकच: प्रेमाने भगवंताचे नामस्मरण करावे. त्याच्या योगाने सर्व मल जाईल. नामस्मरणच रामाची गाठ घालून देईल. चित्तात तशी तळमळ मात्र पाहिजे. 'मी' पणा टाकावा आणि परमात्म्याचे होऊन राहावे.

जो नाम घेतो त्याला देहाच्या सुखदु:खाची जाणीव राहणार नाही. तो आनंदात राहील.

***

## || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

## आपले सण आपले उत्सव महालक्ष्मी/ गौरी

या पुजना विषयी भगवान श्रीकृष्ण युधिष्ठिर ला सांगतात की, लक्ष्मी मातेचे पूजन करून ,या दिवशी रात्री जागरण करावे. त्यात भक्ती गीते ,नृत्य माते समोर सादर करावीत. मातेला मंत्रोच्चार करताना चूक उच्चार झाल्यास, त्याची क्षमा करावी, अशी प्रार्थना करावी. अशा चूक उच्चार केल्यामुळे, जो चुकीचा अर्थ निघतो, तो ध्यानी घेऊ नये, अशी विनवणी मातेस करावी. मातेला प्रार्थना करावी की, हे माते, मी हे पूजन, माझी संपत्ती संतती च्या वृद्धीसाठी करीत आहे. माझी पत्नी, कन्या पुत्र यांच्या कल्याणार्थ मी हे केले आहे. हे पूजन मी अलक्ष्मी च्या नाश होण्या करिता ही करीत आहे. हे व्रत बारा वर्षे पर्यंत किमान करावे, आपण जीवित असा आहे तोपर्यंत ते केलेले अधिक चांगले. या व्रताचे पालन केल्याने संपत्ती व संतती त वाढ होते.

■ महालक्ष्मी व लक्ष्मी यातील फरक

जेव्हा परब्रम्हाला , बहु व्हावे असे वाटले, तेव्हा प्रथम ओमकार नाद निर्माण झाला, व रुख्म रंगाची रुक्मिणी प्रगटली. ही तीन गुणांनी युक्त परमेश्वरी महालक्ष्मी होती. ही सर्व चराचर चे आदी कारण आहे. हीच दृश्य व अदृश्य रूपाने सर्व विश्वाला व्याप्त करते. तप्त सुवर्ण समान तिची कांती आहे. तिच्यामुळेच जग परिपूर्ण झाले आहे. तिने जेव्हा तमो गुण धारण केला तेव्हा ती एका तेज पुंज काजळा सारख्या रूपात प्रकटली. (क्रमश:)

## मुलांसाठी लघु बोधकथा



### ♦ चांगला राजा ♦

एकदा एका तळ्यातला बेडकांना वाटले, की आपल्याला एक राजा हवा. म्हणून त्यांनी देवाकडे तशी मागणी केली. तेव्हा देवाला हसूच आले व त्याने 'हा घ्या राजा !' म्हणून एक लाकडी ओंडका तळ्यात टाकला. तो पाण्यावर पडताच पाणी उसळले. ते पाहून सगळे बेडूक घाबरले आणि बाजूला जाऊन बसले. थोड्या वेळाने पाणी शांत झाल्यावर तो ओंडका काही हालचाल करीत नाही असे पाहून त्याच्यावर चढले व उड्या मारू लागले. मग त्यांना वाटले की या राजापेक्षा दुसरा चांगला राजा हवा. तेव्हा त्यांनी देवाची प्रार्थना करून दुसरा चांगला राजा पाठवण्याची विनंती केली. देवाने एक बगळा पाठविला. त्याने बेडकांना मारून खायला सुरुवात केली. म्हणून बेडकांनी देवाकडे अजून चांगल्या राजाची मागणी केली. ते ऐकून देव म्हणाला, 'मी तुम्हांला पहिला राजा पाठवला होता तो तुम्हांला आवडला नाही. आता तुमचं कर्म तुम्हीच भोगा.'

तात्पर्य
- देवाने ज्या स्थितीत ठेवले आहे त्यात समाधानी असावे



## जेवणानंतर कोथिंबीर चावून खाल्ल्याने पचन सुधारते

ज्योतिर्मय साहित्य

मेथी : मेथी हे मधुमेहींना वरदान आहेच. चवीच्या दृष्टीने पालेभाज्यांत मेथीचे महत्त्व फार मोठे आहे. मधुमेहाच्या प्राथमिक अवस्थेत मेथीची भाजी नियमित खाल्ली तर मेथीपूड मिसळून गव्हाची पोळी खाण्याची पाळी येत नाही. मेथीची पालेभाजी खाल्ल्यामुळे लघवीचा वर्ण सुधारतो. भूक सुधारते, पाचक स्राव वाढतात. बाह्येपचार म्हणून मेथी पालेभाजीचा लेप दुखणाऱ्या सांध्यावर करावा. दु:ख कमी होते. केस गळणे, कोंडा, केस निर्जीव होणे याकरिता मेथीच्या रसाने केस धुवावे.

राजगिरा : राजगिरा बियांचा वापर आहेच. राजगिरा पालेभाजी रक्तशुद्धीकरिता फार उपयुक्त आहे. गंडमाळा, क्षय, लघवीची जळजळ या विकारांत पालेभाजी किंवा त्या पानांचा वाटून लेप करावा. शरीरस्वास्थाकरिता लागणारी द्रव्ये राजगिरा पाने व बिया या दोन्हीही आहेत.

शतावरी : शतावरी पाने अगदी बारीक असतात. लहान मुलांच्या जुलाब, पित्त होणे, दातांचा त्रास या विकारांत रस द्यावा. पाने पौष्टिक आहेत. कंदातील स्तन्यजनन हे गुण पानात अल्प प्रमाणात आहेत. कुंडीत शतावरी शोभेकरिता लावतात. त्यातील पानांचा ताजा रस ताकद कमावण्याकरिता उपयुक्त आहे. गोवर, कांजिण्या, जीर्णज्वर, कडकी या विकारांत ही पालेभाजी पथ्यकर आहे.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

शेपू : उग्र वासामुळे शेपूचा वापर कमी होतो. शेपूची पालेभाजी वात व कफविकारात फार चांगली. पाने स्वच्छ धुऊन घेतली की उग्र वास कमी होतो. अग्निमांद्य, पोटफुगी, गॅस, कुपचन या विकारांत लगेच गुण देणारी ही पालेभाजी आहे. सोबत जिरे, आले किंवा लसूण वापरावा. लहान मुलांच्या पोटदुखी, जंत, कृमी या तक्रारीवर एकवेळी दिलेली भाजी काम करते. ज्या स्त्रियांना मासिक स्राव व्यवस्थित येत नसल्यास त्यांनी काही दिवस शेपूची पालेभाजी खावी. विटाळ नियमित होतो. गळवे पिकण्याकरिता पानांचा लेप करावा. गंडमाळा विकारात पोटात घेण्याकरिता व बाहेरून पानांचा लेप अशा दोन्हीकरिता शेपूच्या पानांचा वापर करावा.

हादगा

हादग्याची फुले पांढरी किंवा जांभळ्या रंगाची असतात. चणापीठ पेरून हादग्याच्या फुलांची कोरडी भाजी फार चविष्ट होते. पूर्वी मिळणाऱ्या अनेक भाज्या अलीकडे दिसेनाशा झाल्या आहेत. हादग्याला आगस्ता असे संस्कृत नाव आहे. आयुर्वेदीय औषधीकरणात मनशीळ शुद्धीकरिता हादग्याच्या पानांच्या रसाचा वापर सांगितला आहे. ठेचाळलेल्या भागावर किंवा जखमेवर पाने ठेचून बांधावी. जखम भरून येते.

****

## प्रभातपुष्प

षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

### सरीवर सरी

पावसाच्या आगमनाने पहा
मृदगंध चौफेर पसरता
नवचैतन्य मनी संचारते
सरीवर सरी येवून
सर्वांना सुखवता खरे
आनंदाला उधाण येते

ऊन सावलीच्या या
सुंदर खेळाने पहा
इंद्रधनू आकाशी फुलले
सरीवर सरी येता
नव प्रेरणा,उत्साहाने
बळीराजा पेरणीला लागले

# प्रकाश हायस्कूल मध्ये सेवा संकल्प अभियानांतर्गत नवसाक्षर जनजागृती व वृक्षारोपण, चला शाळेत जाऊयाअभियानाची सुरवात

**ज्योतिर्मय साहित्य**

कांद्री - सेवा संकल्प अभियानांतर्गत प्रकाश हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, कांद्री यांच्या वतीने नवसाक्षर जनजागृती व वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. नवसाक्षर नागरिकांमध्ये शिक्षणाचे महत्त्व, साक्षरतेची गरज तसेच पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करण्यात आली. तसेच चला शाळेत जाऊया अभियानाची सुरवात कार्यक्रमाला रामटेकचे तहसीलदार रमेश कोळपे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच प्रकाश हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, कांद्रीचे प्राचार्य मिलिंद वानखेडे, पटवारी पृथ्वीराज पाणतावणे



तसेच कांद्री ग्रामपंचायतीचे सचिव मुकुंदा मरस्कोल्हे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरणाचे संरक्षण, वृक्षसंवर्धन आणि समाजातील प्रत्येक घटकाला साक्षरतेच्या प्रवाहात आणण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. बाल गणेश मंडळ कांद्री माईन येथे विद्यार्थी प्रभात फेरी काढण्यात आली नवसाक्षरतेचा फलक लावून कार्यक्रमात विद्यार्थी, शिक्षक व ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.तहसीलदार यांचा हस्ते शाळेत वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ कामिनी पाटील, आभार विजय लांडे यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता श्याम गासमवार,अशोक नाटकर,प्रशांत सरपाते, सौ सुचिता नागपुरे, अनिता खंडाईत, ज्योत्स्ना मेश्राम, अनिता बागडे, बसंत ठकराले, प्रभाकर खंडाते, मिलिंद वाघमारे प्रयत्नशील होते

# महामानव नि:शुल्क संगणक केंद्रातील १८ प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र वितरण

**ज्योतिर्मय साहित्य**

महाळुंगे, पुणे-४५ - महाळुंगे येथील महामानव नि:शुल्क संगणक केंद्रात एप्रिल २०२६ ते ऑगस्ट २०२६ या कालावधीत संगणक प्रशिक्षण पूर्ण केलेल्या १८ प्रशिक्षणार्थींना आज प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. सेवा वस्ती भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख व्हावी, संगणकाचे प्राथमिक ज्ञान मिळावे आणि त्यांच्या भविष्यातील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीला नवी दिशा मिळावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. एकल-ट्रायबल सोसायटी, श्रीभगवती सेवा आश्रम आणि जीवन कौशल्य विकास, बाणेर यांच्या संयुक्त विद्यमाने हा नि:शुल्क संगणक प्रशिक्षण उपक्रम राबविण्यात आला.

प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमास प्रमुख अतिथी व समाजसेवक श्री. दयानंदजी चिखलकर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच श्री. गिरीधर राठी, डॉ. श्याम कुलकर्णी आणि हरित वसुंधराचे श्री. ओमजी चांडक यांची




उपस्थिती लाभली.

या वेळी शाळा व्यवस्थापन समितीच्या सौ. पायल प्रल्हादराव खामकर, मुख्याध्यापक श्री. भीमराव चव्हाण तसेच सौ. पालव, सौ. खोतकर आणि सौ. पाटोळे या शिक्षिका उपस्थित होत्या.

ज्ञान, तंत्रज्ञान आणि संस्कार यांची सांगड घालत आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना सक्षम करण्याचा हा उपक्रम त्यांच्या भविष्यातील वाटचालीसाठी निश्चितच मोलाचा ठरणार आहे. 'सेवा हीच साधना' या भावनेतून सुरू असलेल्या या उपक्रमामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या हातात केवळ संगणकाचे ज्ञानच नव्हे तर उज्ज्वल भविष्याची नवी संधीही येत आहे.




# श्रीयश टेक्निकल कॅम्पसच्या विद्यार्थ्यांचा 'स्केलिंग द सातारा हिल्स' ट्रेकिंग उपक्रम उत्साहात

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - श्रीयश इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च आणि श्रीयश आयुर्वेदिक कॉलेज अँड हॉस्पिटल रिसर्च सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने स्केलिंग द सातारा हिल्स या ट्रेकिंग उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात १५० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

महाविद्यालयाच्या परिसरात वॉर्म-अप सत्रानंतर देवाभाऊ पार्कमार्गे सातारा हिल्सच्या डोंगर परिसरात सुमारे तीन तास ट्रेकिंग करण्यात आले. या दरम्यान विद्यार्थ्यांना विविध औषधी वनस्पती, त्यांचे औषधी महत्त्व तसेच निसर्ग संवर्धनाबाबत माहिती देण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांसाठी शारीरिक तंदुरुस्तीविषयक उपक्रम घेण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, आत्मविश्वास, नेतृत्वगुण, शिस्त, संघभावना व निसर्गाविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली.

कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. सचिन ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. साईप्रसाद साबळे, श्रीमती फरहीन ए. शेख, श्रीमती ज्योती मुरकुटे, श्री. आशिष जिवरख, श्री. यश पाटील व श्री. अद्वैत भाले यांच्या सहकार्याने उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

या कार्यक्रमाचा यशाबद्दल श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. बसवराज मंगरुळे, सहसचिव श्री. अद्वैत मंगरुळे, विश्वस्त कु. ऐश्वर्या मंगरुळे, मुख्य कार्यकारी अधिकारी निवृत्त ब्रिगेडिअर सुरेंद्र गोचके तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी, श्रीयश फार्मसीचे प्राचार्य डॉ. मंगेश घोडके, श्रीयश आयुर्वेदिकचे प्राचार्या डॉ. स्वाती इटगी शिक्षकवर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# शिवप्रतीक नगरी गणेश महोत्सवात भव्य प्रबोधनात्मक काव्यमैफिल संपन्न

## रसिकांच्या टाळ्यांच्या गजरात कवींची साहित्यिक पर्वणी; विचारांचे प्रबोधन

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - शिव प्रतीक नगरी गणेश महोत्सव २०२६ निमित्त आयोजित भव्य प्रबोधनात्मक काव्यमैफिल मोठ्या उत्साहात आणि रसिकांच्या भरभरून प्रतिसादात संपन्न झाली. २१ सप्टेंबर २०२६ रोजी सोमवारी सायंकाळी ७ वाजता शिव प्रतीक नगरी, खडी रोड, संजीवनी हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड येथे ही मैफिल रंगली. गणेशोत्सवाला सामाजिक प्रबोधनाची जोड देण्याचा मंडळाचा उद्देश या मैफिलीने साध्य केला. सभागृह रसिकांनी खचाखच भरले होते. यावेळी राज्यभरातून आलेल्या नामवंत कवींनी आपल्या रचनांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. प्रा.डॉ. सुशिल सातपुते (लातूर) , श्री.विजयकुमार पांचाळ (नांदेड), श्री. रोहिदास शिखरे (छ. संभाजीनगर) सौ. सुनिता कपाळे (छ. संभाजीनगर), श्री. दिपक नागरे (वाशिम) यांच्या भावस्पर्शी कवितांना विशेष दाद मिळाली. यांनी



तरुणाईला दिशा देणारे प्रबोधनात्मक काव्य सादर केले, तर यांच्या मिश्किल आणि मार्मिक शैलीने हास्य आणि विचारांची मेजवानी दिली.

रात्री उशिरापर्यंत रंगलेल्या या मैफिलीला नागरिक, महिला, युवक आणि ज्येष्ठ साहित्यप्रेमींची मोठी उपस्थिती होती. प्रत्येक कवितेनंतर टाळ्यांचा कडकडाट होत होता. कार्यक्रमाचे आयोजन शिव प्रतीक नगरी गणेश महोत्सव मंडळाने केले होते. अध्यक्ष डॉ. मारुती गायकवाड, सचिव धनराज गांगवे, उपाध्यक्ष बालाजी पदीरवाड यांच्यासह सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले .प्रबोधनात्मक कवितांमधून समाजाला नवी दिशा मिळाली असून असेच उपक्रम पुढेही राबवणार असल्याचे आयोजकांनी यावेळी सांगितले.




सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906



# ॥ श्री गणेश चिंतन ॥

*समर्थ रामदास स्वामी कृपेने मनाचे श्लोक व दासबोधाच्या आधाराने "गणेश उत्सवात १० दिवस नियमित एक गणेश चिंतन करू या कारण "जो स्वतः शुभ झाला तोच शुभारंभ करू शकतो"*

**कृतज्ञ मी कृतार्थ मी, भगवंत हृदयस्थ आहे 🙏 अपर्णा परांजपे कात्रज पुणे**

✍समर्थ रामदास स्वामी कृपेने मनाचे श्लोक व दासबोधाच्या आधाराने "गणेश चतुर्थी ते अनंत चतुर्दशी" १० दिवस नियमित एक गणेश चिंतन करू या कारण "जो स्वतः शुभ झाला तोच शुभारंभ करू शकतो"

"समर्थांचे गणेशतत्त्व"

आज आपण गणेशस्तवनाचा पुढचा आणि अत्यंत महत्त्वाचा धागा—"गणेश → विद्या → बोध → परमार्थ" घेऊया. मूळ पाठ पुन्हा पडताळला आहे; दासबोधाच्या पहिल्या दशकातील दुसरा समास हा गणेशस्तवन असून त्यात ३० ओव्या आहेत.

गणेश : विद्या नव्हे, बोधाकडे नेणारी विद्या

आपण मागच्या भागात पाहिले की समर्थांची सुरुवातच—

ॐ नमोजि गणनायका ।
सर्वसिद्धिफळदायका ।
अज्ञानभ्रांतिछेदका ।
बोधरूपा ॥

आज याच "बोधरूपा" या शब्दाचा पुढचा विस्तार पाहू.

१. समर्थांच्या गणेशाला विद्या का हवी?

गणेशस्तवनातील पुढील वर्णनात गणेशाच्या स्वरूपाशी विद्या आणि प्रज्ञेचा संबंध येतो. पण इथे एक सूक्ष्म फरक आहे—

माहिती मिळणे म्हणजे बोध होणे
पुस्तके वाचून माहिती मिळू शकते.
तर्काने बुद्धी तीक्ष्ण होऊ शकते.
पण "मी कोण?" या प्रश्नाचा
अंत:करणाला स्पर्श झाला की तो बोध.

म्हणून समर्थांचा गणेश केवळ परीक्षेत यश देणारा किंवा स्मरणशक्ती वाढवणारा देव नाही.

त्यांचा पहिलाच शब्द आपल्याला दिशा देतो—

अज्ञानभ्रांतिछेदका । बोधरूपा ॥

म्हणजे विद्या ही शेवटी अविद्येचा क्षय करून बोधात उतरली पाहिजे.

२. म्हणूनच पुढे "मंदमती"चा उल्लेख समर्थ म्हणतात—

जे मूर्ख अवलक्षण ।
जे कां हीणाहूनि हीण ।
तेचि होती दक्ष प्रविण ।
सर्वविशई ॥२८॥

ही ओवी फार सहजपणे "गणपतीची पूजा केली की मूर्ख माणूस हुशार होतो" अशी घेतली जाते.

पण समर्थांच्या संपूर्ण संदर्भात अर्थ अधिक खोल आहे. (क्रमशः)

# विचार ते विजय



लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013

## मनातील भीतीवर विजय कसा मिळवावा?

प्रत्येक माणसाच्या मनात एखादं स्वप्न असतं.
कुणाला मोठं अधिकारी व्हायचं असतं...
कुणाला स्वत:चा व्यवसाय सुरू करायचा असतो...
कुणाला व्यासपीठावर उभं राहून आपल्या विचारांना शब्द द्यायचे असतात...
तर कुणाला आयुष्याची दिशा बदलणारा एखादा निर्णय घ्यायचा असतो.
पण स्वप्नांच्या दाराशी पोहोचल्यावर अनेकदा पावलं थबकतात.
"मला जमेल का?"
"मी अपयशी ठरलो तर?"
"लोक हसले तर?"
"सगळं गमावलं तर?"
या प्रश्नांची उत्तरं शोधण्यातच आपण इतके गुंततो की स्वप्नांच्या दिशेने पहिलं पाऊल टाकायचं विसरून जातो.
भीती आपल्याला पडण्यापासून वाचवते; पण तिच्याच भीतीने आपण चालणंच थांबवलं, तर आयुष्यभर एका जागीच राहतो.
कधी कधी आपल्या आयुष्यात सर्वात मोठा अडथळा रस्त्यावर नसतो... तो आपल्या मनात असतो.
नवीन काम सुरू करायचं असतं, पण अपयशाची भीती वाटते.
मनातलं बोलायचं असतं, पण नकाराची भीती वाटते.
स्वप्न पूर्ण करण्यासाठी पाऊल उचलायचं असतं, पण लोक काय म्हणतील याची चिंता सतावते.
आणि मग आपण स्वत:लाच समजावतो—"थोडं थांबूया... योग्य वेळ येऊ दे..."
पण अनेकदा ती योग्य वेळ येत नाही. कारण वेळेची वाट पाहताना आपण आपल्या भीतीला आणखी मोठं करत असतो.
"भीती वाटत नाही म्हणून माणूस धाडसी ठरत नाही; भीती वाटत असतानाही एक पाऊल पुढे टाकतो, तेव्हा खऱ्या विजयाची सुरुवात होते."
भीतीवर विजय मिळवणं म्हणजे मनातून प्रत्येक शंका पुसून टाकणं नव्हे. भीती असतानाही योग्य कृती करणं म्हणजे विजयाची सुरुवात.
त्यासाठी— भीतीला ओळखा.
नेमकी कशाची भीती वाटते, हे स्वत:शी प्रामाणिकपणे विचारा.
छोटं पाऊल उचला. संपूर्ण प्रवासाचा विचार करून घाबरण्याऐवजी आजची एक कृती पूर्ण करा.
अपयशाला अनुभव माना. चूक झाली तर स्वत:ला दोष देत बसू नका; त्यातून शिकून पुन्हा उभे राहा.
स्वत:शी विश्वासाने बोला. "मला जमणार नाही" या विचाराऐवजी "मी प्रयत्न करेन, शिकेन आणि पुढे जाईन" असं स्वत:ला सांगा.
आणि सर्वात महत्त्वाचं—गरज वाटल्यास विश्वासू व्यक्तीशी मनातली भीती बोला. प्रत्येक लढाई एकट्याने लढायलाच हवी असं नाही.कदाचित जुन्या अपयशाने तुमचा आत्मविश्वास दुखावला असेल. कदाचित इतरांच्या शब्दांनी तुमच्या मनात स्वत:बद्दल शंका निर्माण केली असेल.
पण स्वत:ला एवढंच सांगा—
"मी घाबरलो आहे, याचा अर्थ मी कमजोर नाही. मी अजून प्रयत्न केलेला नाही, याचा अर्थ मी हरलोही नाही."
आयुष्याच्या शेवटी कदाचित अपयशाच्या काही आठवणी वेदना देतील; पण प्रयत्नच न केलेल्या स्वप्नांची खंत मनाला अधिक बोचू शकते.
म्हणून आज स्वत:च्या भीतीला एक प्रश्न विचारा—
"तू मला किती दिवस थांबवणार? माझ्या स्वप्नांवर तुझाच अधिकार आहे का?"
आणि मग थरथरणाऱ्या पावलांनी का होईना, पुढे चला.
कारण धैर्यवान माणूस तो नसतो, ज्याच्या डोळ्यांत कधी अश्रू येत नाहीत...
धैर्यवान तो असतो, जो डोळ्यांत अश्रू असतानाही स्वत:ची स्वप्नं जिवंत ठेवतो.
भीतीला मनाचा मालक बनवू नका; तिला केवळ एक मार्गदर्शक मानून पुढे चला. अंधार कितीही दाट असला, तरी एका लहानशा दिव्याची ज्योत त्याला भेदून जाते.
तुमच्या मनातील आत्मविश्वासाचा तो दिवा पेटवा, भीतीचे सावट आपोआप वितळून जाईल आणि तुमची वाटचाल विचारांकडून विजयाकडे होईल!



# महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

## 'आई-मुलगी' (बिंब आणि प्रतिबिंब)

'नात्यांचं महावस्त्र' विणताना आपण आतापर्यंत आई, बाबा, आजी, आजोबा, मामा, मावशी, आत्या, काका, बहीण-भाऊ आणि संसाराची चौकट भक्कम करणारे पती-पत्नी हे समृद्ध पदर अनुभवले. या महावस्त्रात एकाच रूपाचे दोन अंश असणारा, मायेचा अखंड पाझर वाहणारा आणि एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे वात्सल्याचा वारसा नेणारा सर्वात हळवा पदर म्हणजेच 'आई आणि मुलगी'! हे नातं म्हणजे निव्वळ हाडामांसाचं नातं नसतं, तर ते साक्षात 'बिंब आणि प्रतिबिंब' असतं. लहानपणी अभ्यासात असणाऱ्या काही कविता आयुष्यभर मनात घर करून राहतात; कारण त्या कवितांमध्ये आपले संपूर्ण भावविश्व व्यापून टाकण्याची ताकद असते. कवी कृ. ब. निकुंब यांची 'घाल घाल पिंगा वाऱ्या' ही अशीच एक अजरामर कविता. या कवितेत सासरी गेलेली लेक वाऱ्याला साद घालत आपल्या आईची आठवण काढते. ती म्हणते—

"घाल घाल पिंगा वाऱ्या माझ्या परसात,
माहेरी जा सुवासाची कर बरसात..."

सासरी गेलेल्या आपल्या मुलीची आईला अखंड काळजी असते, म्हणून ती लेक वाऱ्याला विनवते—

"सुखी आहे पोर सांग आईच्या कानात,
आई, भाऊसाठी परी मन खंतावतं..."

पुढे या कवितेचे गाणे झाले आणि सुमन कल्याणपूर यांच्या अमृततुल्य स्वरांनी या शब्दांचे सोने झाले! सुमनताईंच्या गोड गळ्यातून सासरी गेलेल्या लेकीच्या भावना जणू मूर्तिमंत प्रकट होतात. आजही ते गाणे ऐकले की डोळे पाणावल्याशिवाय राहत नाहीत. मी जरी पुरुष असलो, तरी ते गाणे ऐकताना ती लेक माझ्या मनात पाझरते आणि डोळ्यांतील अश्रूंच्या रूपाने बाहेर पडते. वसंतराव देशपांड्यांनी गायिलेले 'दाटून कंठ येतो' हे गाणेही असेच; अर्थात ती सासरी जाणाऱ्या लाडक्या लेकीसाठी वडिलांच्या हृदयात दाटलेली अथांग वेदना असते. (क्रमशः)

# विश्वात सर्वांत थोर दैवत ‘‘आई’’

ज्योतिर्मय साहित्य

माणसाचा जेव्हा जन्म होतो. तेव्हा माणूस शिशू अवस्थेत असतो. जेव्हा, मूल एक दोन वर्षांचं होतं. तेव्हा , त्याला आई बाबाची ओळख होते.

त्यातल्यात्यात बाबांपेक्षा आईची जास्त ओळख मुलाला होते. कारण, बाबा दिवसभर नोकरीला कार्यालयात जातात. मूल मोठं होईपर्यंत तरी साधारणपणे दिवसरात्र आईजवळंच असते. त्यामुळे, त्याला आईचा लळा जास्त लागतो. मग,साहजिकच आई जसं सांगेल तसं ते मूल वागण्याचा बोलण्याचा प्रयत्न करु लागते. ते मूल दोन वर्षांचं झाल्यावर चालू लागल्यावर आई सांगेल तसं बोलू लागते. वागू लागते. म्हणून आई हीच मुलाचा पहिला गुरु असते. त्यामुळे, पहिला प्रभाव मुलावर आईचाच पडतो. तसं माझ्याही बाबतीत झालं. लहानपणी वडील जास्त सहवासात आले नाहीत. कारण, पन्नास साठ वर्षांपूर्वी एकत्र कुटुंब पद्धती होती. तेव्हा त्याकाळात आईवडील आम्ही भावंडे काका काकू आणि त्यांची मुलंमुली व आजी असे सर्वजण एकत्र राहत असल्यामुळे लहानपणी वडीलांचा सहवास जास्त लाभला नाही. त्यामुळे, आईच्या संस्कारातंच लहानाचा मोठा झालो. आई‘‘ या नावातच अमृताची गोडी आहे. आई! या शब्दाचा अर्थ ह्रदयी लक्षात घेतल्यानंतर आ म्हणजे आनंद देणारी ई म्हणजे ईश्वरस्वरुप अशी आईची महत्तमता व श्रेष्ठता लक्षात येते. घरातील आम्हां भावंडांचं संगोपन करणं आणि सुखसमाधान देणं हेच तिचं विश्व होतं आईचा स्वभाव खूप प्रेमळ आणि सर्वांना आपलंसं करणारा होता. प्राथमिक इयत्तेपर्यंतंच आईचं शिक्षण झालं होतं. पण, तिला कौटुंबिक,



सामाजिक, धार्मिक ज्ञान खूप होतं. शिक्षण जरी कमी झालं असलं तरी मुलांनी कसं वागावं,किती शिकलं पाहिजे. नोकरीसाठी काय केलं पाहिजे.कुठं जायला पाहिजे याचं मार्मिक आणि उत्तम ज्ञान आईला होतं. सत्तर वर्षांपूर्वी एकत्र कुटुंब पद्धती होती.त्यामुळे, घरातील मोठी मंडळी आईला इंदिरावहिनी असंच म्हणत असत. म्हणून, आम्ही भावंडही आईला वहिनीच म्हणू लागलो. वहिनींनी केलेला सर्व स्वयंपाक कधीही कमी पडायचा नाही. कितीही

माणसं जेवली तरी अन्न शिल्लकच राहिलेलं असायचं. त्यांना श्रीअन्नपूर्णादेवी प्रसन्न होती,

असेच सारेजण म्हणत. सणावाराच्या काळात आणि श्री तुळजाभवानीदेवीच्या नवरात्रात दस-यापर्यंत रोज आई भरपूर पुरणाच्या पोळ्या करीत असे. रोज सवाष्ण , ब्राह्मण जेवायला असत.त्यांना रोज गरमगरम पुरणाच्या पोळ्यांचा जेवण असे. तसेच, धुणेवाली,भांडे वाली व आसपासच्या गरीब लोकांना ती ताज्या पुरणाच्या पोळ्या, वाटीत शुध्द तूप, भाज्या डब्यात देत असे.त्याकाळात १९७०-८०च्या दशकातआजच्या सारखी मार्गदर्शन केंद्रे नव्हती. तसेच, कुणीही कुणाला मार्गदर्शनही करीत नसे.त्यामुळे पदवीपर्यतचं शिक्षणघेतल्यानंतर वहिनींच्या(आईच्या )

मार्गदर्शनानुसार मी नोकरीसाठी म्हणून माझ्या मावशीच्या घरी पुण्याला गेलो. मावशीची परिस्थितीही गरीबीची होती. पण, तिचा व तिच्या पतीचा स्वभाव मात्र मनमोकळा असा मोठ्या मनाचा होता. तशा परिस्थितीतही त्यांनी मला त्यांच्या तीन मुलांसह सांभाळलं.ती जागा म्हणजे दहा बाय बाराची मोठी खोली होती. असं ते छोटेखानी घर होतं. माझे मोठे दोन मामाही व मोठा भाऊही पुण्यात नोकरीसाठी काही महिने त्या छोटेखानी घरात राहीले होते. मी सुध्दा नोकरी निमित्ताने दोन महिने मावशीकडे त्या छोटेखानी घरात राहिलो होतो.

सारसबागेतील श्रीगणेश देवाच्या कृपेने व आशिर्वादाने मला सरकारी लागली. सन १९७०-८० काळात त्यावेळेसच्या काळाप्रमाणे आमच्या घरी दरवर्षी दिवाळीचा सण मोठ्या थाटामाटात साजरा होत असे. आमच्या घरासमोरच्या अंगणात



मधुकर निलेगावकर, पुणे
मो. 94213 75691

आम्ही छान बाग लावलेली होती. त्यात अनेक प्रकारची फुलझाडे होती.त्या झाडांना गुलाबी,लाल,

निळी,पिवळी,पांढरी व केशरी अशा विविध रंगांची फुले येत असत. तसेच, झेंडूची विविध प्रकारची व आकारानेही अनेकविध अशी लहानमोठी पिवळी, लाल, अशी भरपूर फुले येत असत. सुर्यफ ुलासारखे झेंडू, गेंद झेंडू अशी फ ुलेही भरपूर येत असत. दसरा सण झाला की, आम्हा भावंडांना दिवाळी सणाचे वेध लागत असत. मग, त्या सणाच्या आकर्षणाने आमच्या मनात विविध वस्तूंच्या आणि फटाक्यांच्या खरेदीचे मनसुबे मनात ठरत असत. त्यादृष्टीने मग, आम्ही आईकडे वडीलांना सांगण्याची लाडीगोडी करीत असू.

वडील मनाने मोकळे होते. पण, कडक स्वभावाचे होते. त्यामुळे, आम्ही कोणीही त्यांना प्रत्यक्षपणे बोलण्याचे, काही सांगण्याचे धाडस करीत नसे. कारण, त्यावेळेसचा काळंच वेगळा होता. **(क्रमशः)**

# शंकरराव भेलके महाविद्यालयात अविष्कार संशोधन स्पर्धा उत्साहात संपन्न



ज्योतिर्मय साहित्य

नसरापूर (पुणे) - पुणे विद्यापीठाच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता कक्ष आणि शंकरराव भेलके महाविद्यालय, नसरपूर (तालुका भोर, जिल्हा पुणे) यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात ‘अविष्कार संशोधन स्पर्धा २०२६-२७’ अत्यंत उत्साहात पार पडली. विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड निर्माण करणे आणि त्यांच्यातील वैज्ञानिक व नाविन्यपूर्ण दृष्टिकोनाला प्रोत्साहन देणे हा यामागचा मुख्य उद्देश होता.

**कार्यक्रमाची सुरुवात आणि उपस्थिती**

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी १० वाजता क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. महाविद्यालयाच्या प्राध्यापिका तथा प्राचार्या डॉ. शर्मीला चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या स्पर्धेत पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. सूत्रसंचालन प्रा. डॉ. जगदीश शेवते यांनी केले, तर प्रा. सहदेव रोडे यांनी कार्यक्रमाचे योग्य नियोजन व समन्वय साधले.

**विद्यार्थ्यांचे नाविन्यपूर्ण संशोधन प्रकल्प**

विद्यार्थ्यांनी सामाजिक, आर्थिक, पर्यावरण, तंत्रज्ञान आणि शाश्वत विकास यांसारख्या विविध समकालीन विषयांवर आपले संशोधन प्रकल्प सादर केले. यामध्ये प्रामुख्याने खालील विषयांचा समावेश होता:

१. निर्गुडीपासून हर्बल धूप व अगरबत्ती निर्मिती.

२. राजगड तालुक्यातील दुर्गम भागाचा शाश्वत विकास

३. एक गाव एक ब्रँड आणि ब्रँड सोशल मीडिया

४. तरुणांमधील इंस्टाग्रामच्या रोजच्या वापराचा अभ्यासावरील प्रभाव

५. यूपीआयमुळे वाढती खर्च करण्याची मानसिकता

६. घनकचरा व्यवस्थापन प्रणाली आणि व्हर्मीकम्पोस्ट मॉडेल

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या वरील प्रकल्पांचे मूल्यमापन डॉ. रोहिदास ढाकणे, प्रा. डॉ. जगदीश शेवते आणि डॉ. दत्तात्रय घोडके यांनी परीक्षक म्हणून काम पाहताना केले. प्राचार्या डॉ. शर्मीला चौधरी यांनी विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञानावर अवलंबून न राहता परिसरातील समस्यांवर संशोधनात्मक उपाय शोधण्याचे आवाहन केले. महाविद्यालयाचे कृषी/शैक्षणिक संशोधन समन्वयक प्रा. सहदेव गंगाराम रोडे यांनी विद्यार्थ्यांना प्रकल्पाबाबत मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष सहकार्य केले. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमधील संशोधनात्मक कौशल्ये, सृजनशीलता आणि समस्या निवारणाची क्षमता विकसित होण्यास मोठी मदत झाली आहे.

# ईश्वरीस पत्र.....

ज्योतिर्मय साहित्य

!!श्री सरस्वती प्रसन्न !!

माझी मुलगी

प्रिय ईश्वरी...... खूप आशीर्वाद! मनापासून सदीच्छा.

आज अचानक मी तुला लिहिलेले पत्र वाचून तू विचारात पडशील. खरं तर, आज काही खास निमित्त नाही, पण तुला सांगावसं वाटलं. हितगुज करावस वाटल. तू किती मोठी झालीस, हे पाहताना मला खूप अभिमान वाटतो. माझ्या कुशीत खेळणारी माझी लाडकी परी आता स्वतःचे पंख पसरून आकाशात भरारी घ्यायला सज्ज झाली आहे.

ईश्वरी..... माझी इशू.... तू जन्माला आल्यानंतरच माझं आयुष्य खऱ्या अर्थाने सुरू झालं; तुझ्या प्रत्येक श्वासाबरोबर एक नवं साहस, एक नवी भावना आणि आयुष्याचा अर्थ समजून घेण्याचा एक नवा अनुभव मला मिळाला. तुझ्या पहिल्या काही महिन्यांत मला काहीच कळत नव्हतंतू पहाटे ४ वाजता का रडत होतीस हे ही मला समजत नसायचं आणि खरं सांगायचं तर, तुला समजून घेण्याचा प्रयत्न करताना मी माझा पुनर्जन्म अनुभवत होते. तुझ्यासोबतचा प्रत्येक क्षण हा अनपेक्षित, सुखद घटनांची एक साखळी होती, ज्यातून मला ‘आईपण’ म्हणजे काय हे शिकायला मिळालं. तुझ माझ्याकडे पाहून निरागस हसणं, तुझे बोबडे बोल, रुसण, हट्ट करण, माझ्या कामात लुडबुड करण, माझी आई होऊन मला आधार देण हे सारे सारे मनाला आनंद देवून जाते बघ.....



सौ. रेवती राहुल मोहरीर
(सहशिक्षिका)
केएलई इंग्लिश मीडियम स्कूल,
जुळे सोलापूर, सोलापूर मो.
8928348598

प्रिय ईश्वरी...... तू आता बारावीची परीक्षा देत आहेत. पुढे तुझ्या ज्ञानाच्या कक्षा रूंदावतील. तुझे ध्येय आता तू निश्चित केले आहेस त्या दृष्टीने अध्ययनाद्वारे तुझा मार्ग निवडला आहेस यात मी खूप समाधानी आहे. माझे पत्र म्हणजे आपुलकी आणि मार्गदर्शनाचा एक भावनिक ठेवा आहे. हे पत्र आयुष्यातील चढ-उतारांवर खंबीर रहा, स्वतःवर विश्वास ठेव, सुसंस्कारांचे पालन कर आणि आयुष्याचा आनंद घे यांसारख्या महत्त्वाच्या गोष्टी सांगण्यासाठी हा शब्दांचा पसारा मांडते, ज्यामुळे तू एक स्वतंत्र आणि आनंदी धाटणीची व्यक्ती बनशील.

बेटा, आयुष्य खूप सुंदर आहे, पण कधीकधी ते आव्हानात्मकही असू शकतं. तुला आयुष्यात अनेक निर्णय खंबीरपणे घ्यावे लागतील. निर्णय विचारपूर्वक घे आणि त्या परिणामांची जबाबदारी घेण्याची ताकद स्वतःमध्ये निर्माण कर.

आयुष्यात यशाच्या मागे धावताना स्वतःचा आनंद विसरू नकोस. तू स्वतंत्र आहेस, स्वतःचे विचार स्वतः बनव, जगाच्या मागे धावू नकोस.तु कुणाच्या तरी आवडीची व्हावीस यासाठी शरीर हे माध्यम कदापि निवडू नकोस. तसेच खरे प्रेम पण जाण.त्या प्रेमाचा आदर कर,परंतु त्यात लालसा, भोग, आकर्षण असेल तर तश्या प्रेमाचा कदापि स्वीकार करू नकोस. संस्कारहीन व भरकटलेल्या जगात पाऊलही ठेवू नकोस. अपयशाने खचून न जाता, प्रत्येक अडथळ्यातून काहीतरी नवीन शिकण्याचा प्रयत्न कर. स्व ची ओळख निर्माण कर, तू अनमोल आहेस. तू दोन घरांना व अनेक मने जोडणारी दुवा आहेस. प्रत्येक नात्याला न्याय दे. चंगळवादी वृत्तीचा सदैव त्याग कर.

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, माणुसकी आणि संस्कार जपत राहा. सासर असो वा माहेर, तिथे प्रेम आणि आपुलकी निर्माण कर. तुला हवं ते सर्व मिळव, पण प्रामाणिकपणाची साथ कधीही सोडू नकोस.

आयुष्याच्या कोणत्याही क्षणी मला आठव..... बाळा..... मी तुझ्या सोबत असेल.

तुझ्या प्रत्येक निर्णयामागे माझी सावली म्हणून मी नेहमीच तुझ्या सोबत आहे.

तुझी खूप काळजी घे.
खूप खूप आशीर्वाद
तुझीच आई
- रेवती मोहरीर



पुराणातील विश्व:एक चिकित्सक अन्वेषण अंतिम भाग ९

शांडिल्यगोत्रोत्पन्नभालेरावमुकुन्दोऽहम्
छत्रपतीसम्भाजीनगरम्
विद्युतसन्देशसूत्रम्-bhalerao.mukund@gmail.com
भ्रमणभाषक्रमान्क: ८३०८८३५३१३

## पुराणे आणि आधुनिक विज्ञान : संघर्ष नव्हे, तर चिकित्सक संवाद

भारतीय परंपरेचे दुसरे महत्त्वाचे योगदान याचबरोबर हेही लक्षात ठेवणे आवश्यक आहे की भारतीय खगोलविचाराची संपूर्ण परंपरा पुराणांपुरती मर्यादित नाही. वेदांग ज्योतिष, सूर्यसिद्धान्त, आर्यभटीय आणि पुढील सिद्धान्तग्रंथांमध्ये अधिक गणितीय आणि निरीक्षणाधारित खगोलशास्त्र विकसित झाले. आर्यभटाने पृथ्वीच्या भ्रमणाची कल्पना मांडली; ग्रहणांचे गणितीय स्पष्टीकरण दिले; कालगणना आणि खगोलीय गणित विकसित केले. पुढे ब्रह्मगुप्त, भास्कराचार्य आणि इतर आचार्यांनी या परंपरेला अधिक समृद्ध केले, म्हणून प्राचीन भारताच्या वैज्ञानिक परंपरेचा गौरव करायचा असेल, तर तो पुराणातील प्रत्येक संख्येला आधुनिक विज्ञानाशी जुळवून करण्याची गरज नाही. उलट, आर्यभट आणि इतर गणितज्ञांनी प्रत्यक्ष गणित, निरीक्षण आणि खगोलीय गणनांच्या क्षेत्रात केलेले कार्य हे स्वतःमध्येच पुरेसे प्रभावी आहे.

पुराणांकडे पाहण्याची योग्य दृष्टी

म्हणून पुराणांकडे पाहताना तीन शब्द आपल्या मार्गदर्शक तत्त्वांसारखे असायला हवेत—

श्रद्धा, पण अंधश्रद्धा नव्हे.
अभिमान, पण अतिरंजना नव्हे.
चिकित्सा, पण अवमान नव्हे.

आपल्या प्राचीन ज्ञानपरंपरेचा आदर करणे आणि तिचे चिकित्सक परीक्षण करणे या दोन गोष्टी परस्परविरोधी नाहीत. खरे तर चिकित्सक अभ्यासातूनच परंपरेचे खरे सामर्थ्य उलगडते. विष्णुपुराणातील ग्रहांची अंतरमांडणी आधुनिक खगोलशास्त्रातील वास्तविक अंतरांशी तंतोतंत जुळत नाही, हे स्पष्टपणे मान्य केल्याने आपल्या परंपरेचा गौरव कमी होत नाही. उलट, आपण पुराणातील विश्वकल्पना आणि भारतीय गणितीय खगोलशास्त्र यांचे स्वतंत्र योगदान अधिक प्रामाणिकपणे मांडू शकतो, आणि कदाचित हाच या संपूर्ण अभ्यासाचा सर्वांत महत्त्वाचा धडा आहे.

प्राचीन ग्रंथांना आधुनिक विज्ञान सिद्ध करण्यासाठी वापरण्याची गरज नाही.

त्यांना त्यांच्या स्वतःच्या बौद्धिक संदर्भात समजून घेतले, त्यांच्या संकल्पनांची चिकित्सा केली आणि त्यातून मानवी विचाराच्या विकासाचा इतिहास उलगडला, तर त्यांचे महत्त्व अधिक व्यापक होते. पुराणे आपल्याला भूतकाळातील मनुष्याच्या विश्वाकडे पाहण्याची दृष्टी देतात. आधुनिक विज्ञान आपल्याला त्या विश्वाचे निरीक्षण, मापन आणि परीक्षण करण्याची साधने देते.

भूतकाळाची विश्वदृष्टी आणि वर्तमानाचे विज्ञान यांचा संघर्ष करण्यापेक्षा त्यांच्यात संवाद घडवून आणणे—हीच अधिक समृद्ध आणि वैज्ञानिक भूमिका ठरते.

याच संवादातून आपल्याला आपल्या ज्ञानपरंपरेचे खरे स्वरूप समजेल आणि कदाचित भविष्याकडे पाहण्यासाठीही एक अधिक व्यापक दृष्टी मिळेल.

इति लेखमाला.



अष्टविनायक महिमा

## थेऊर

सौ.माधुरी पळणिटकर मो.९९२१४९५५३३

अष्टविनायकांपैकी थेऊरचा श्री चिंचवडचे सत्पुरूष चिंतामणी महाराजांनी सुमारे ४०,०००/- रूपये खर्च करून हे गणतपती मंदिर बांधले. या श्री मंदिराला पेशवेकालीन भव्य तटबंदी असून त्यात प्रशस्त ओवऱ्या निर्माण करण्यात आल्या आहेत. थेऊरचा विस्तार हा माधवराव पेशवे यांनी केला. त्यांचे निधन थेऊरलाच झाले. श्री चितांमणीची मूर्ती भव्य, पूर्वाभिमुखी व डाव्या सोंडेची आहे. उत्तर दिशेला दक्षिणमुखी हनुमान स्थापित आहेत. श्री चिंतामणीच्या पाठीशी पश्चिमेला असणाऱ्या गणेशाला लंबोदर गणेश अशी संज्ञा आहे. ब्रह्मदेवाने आपले चित्त स्थिर करण्यासाठी गणपतीची या जागी आराधना केली, त्यामुळे या गावाला थेऊर असे नाव पडले, अशी आख्यायिका आहे. या संदर्भात एक कथा आहे. राजा अभिजित व राणी गुणवतीचा मुलगा गुणाने कपिलमुनींकडे असलेला चिंतामणी हे रत्न चोरले. कपिलमुनींना हे कळले तेव्हा त्यांनी गणपतीला ते रत्न गणाकडून परत आणण्याची विनंती केली गणपतीने गुणाचा वध करून ते रत्न कपिलमुनींना दिले. मात्र कपिलमुनींनी हे रत्न गणपतीला अर्पण केले त्यामुळे गणपतीला चिंतामणी या नावाने ओळखले जावू लागले. हे मंदिर महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यात थेऊर येथे मुठा नदीच्या संगमाजवळ आहे. चिंतामणी म्हणजे सर्व चिंता मुक्त करणारा. आजच्या स्पर्धात्मक धकाधकीच्या जीवनात मनुष्य हा विविध समस्यांनी त्रासलेला आहे.

आज सुखसुविधा असूनही मनुष्याला ईर्षा, मोह, मत्सर हे विकार मनःशांती मिळवून देत नाही. वाढती महागाई, गुन्हेगारी, आधुनिक तंत्रज्ञान या सर्वांचा सामना करताकरताच मनुष्य खचून जातो. पूर्वीच्या पिढीला इतक्या सुखसोयी उपलब्ध नसताना देखील प्रत्येकाच्या घरात आनंद, सुख-समाधान होते. आज कुणाचे चांगले झाले तरी दुसऱ्याला चिंता होते. गणपती उत्सव हा आनंददायी असावा; परंतु कानठळ्या बसणाऱ्या बीभत्स गाण्यांनी आजूबाजूच्या लोकांना त्रास होतोय याची जाणीव मंडळाच्या कार्यकर्त्यांना कधीच नसते. किंबहुना नागरिकांनी तक्रार करूनही आपलेच खरे करणे व सर्वांच्या झोपा उडवून आपण बेताल वागणे ही भूमिका मंडळातील कार्यकर्ते घेतात. भव्य मिरवणुका काढून रस्ते अडवणे आणि सामान्य नागरिकांना दैनंदिन कामात अडथळे निर्माण करणे हाच गणेशोत्सवाचा उद्देश असल्याचे ते कृतीतून दाखवत असतात. मिरवणुकीत होणारी मारामारी, भांडणे, हल्ले हाच आता चिंतेचा विषय बनू लागला आहे. पोलिसांना, नागरिकांना सर्वतोपरी सहाय्य करून गणेशोत्सव शांततेत पार पडू शकतो. 'सामाजिक ऐक्य' ही लोकमान्य टिळकांची तळमळ लक्षात घेवून हा वारसा पुढच्या पिढीस देवू, सर्व चिंता चिंतामणी'च्या चरणी वाहून उत्सव साजरा करू.





भाद्रपद शुक्ला चतुर्दशी, {दि. २५ सप्टेबर २०२६}

## दहावा आत्मधर्म : उत्तम ब्रह्मचर्य धर्म

ब्रह्मचर्य या महान तपा शिवाय आजपर्यंत कोणीही मुक्तीला प्राप्त केलेले नाही. उत्तम ब्रह्मचर्य शिवाय केलेले अन्य सर्व तप निष्फळ होतात. _ब्रह्म म्हणजेच दैवी चेतना,_ त्याच्या प्राप्तीसाठी केलेला साधना पूर्ण प्रवास म्हणजे ब्रह्मचर्य. सर्व इंद्रियांच्या विषयावरील अनुराग म्हणजेच आसक्ती नाहीशी करून ब्रह्म म्हणजेच आत्म्याचा ज्ञान दर्शन चारित्र्य रूपी स्वभाव याकडे उत्कृष्ट प्रतीने प्रवृत्त होणे हे ब्रह्मचर्य आहे.

प्राण्यांमध्ये कामवासना असणे ही जीवशास्त्रीय घटना, परंतु मनुष्यामध्ये कामवासना ही विषय विकाराच्या स्वरूपामध्ये विद्यमान होते. म्हणून प्राण्यांच्या संदर्भात ब्रह्मचर्येचा विषय येतच नाही,ब्रह्मचर्येची आवश्यकता म्हणूनच मनुष्यामध्ये भासते. संसारामध्ये प्रत्येक प्राणी पंचेंद्रियांच्या विषय सुखाच्या अधीन असल्यामुळे आत्मज्ञानापासून दूर असतो. साधारणपणे कामवासनेत आसक्त असणे यालाच ब्रह्मचर्येचा विरोधी समजले जाते. परंतु सर्वच पाच इंद्रियांच्या द्वारे जी आसक्ती निर्माण होते, त्यामुळे ब्रह्मचेतनेचा घात होतो. अब्रह्मचर्याचा अर्थ फक्त स्पर्शनेंद्रिय सुखाच्या इतकाच संकुचित घेतला जातो. परंतु स्पर्शनेंद्रियाची व्यापकता इतके मोठी आहे की त्याच्या आधीन आणि त्याच्या क्षेत्रामध्ये इतर चार इंद्रिय येतात.

म्हणून स्पर्श, रूप, गंध,रस, वर्ण इत्यादी च्या विषयांमध्ये आसक्त असणे इतकी व्यापक अशी कामवासना आहे. ब्रह्मचैतन्याच्या प्राप्तीचा मार्ग सर्वच पाचही इंद्रियांच्या निग्रहपथा मधून जातो. पाचही इंद्रियाद्वारे कामविकार उत्पन्न न होण्यासाठी शरीर व आत्मा ही परस्पर अत्यंत भिन्न आहेत या विचाराचा मोठा संकल्प सतत मनात करत राहणे हा उत्तम उपाय आहे. हे भेद विज्ञान झाले नसेल तर पुष्कळसे शास्त्रज्ञान असूनही व्यक्ती काम विकाराचा नाश करू शकत नाही.

संसारातील समस्त जीवांच्या सर्व प्रकारच्या दुःखाचे मूळ हे काम भोगांची वासना हेच आहे. जो साधक या सर्व इंद्रियांच्या विषयांच्या भोगावरती विजय प्राप्त करून वीतराग म्हणजेच राग द्वेष रहित अवस्थेला प्राप्त होतो, तो सर्व प्रकारच्या दुःखातून मुक्त होतो. अशा या अत्यंत खडतर आणि कठीण अशा ब्रह्मचर्य व्रताचे जे पालन करतात त्या महान तपस्वीस देव, दानव, गंधर्व, यक्ष, राक्षस, किन्नर, आदी सर्व नमस्कार करतात असे शास्त्र वचन आहे. उत्तम ब्रह्मचर्य हा आत्म्याचा मूळ स्वभाव लक्षण आहे. त्याचा उत्तर उत्तर विकास साधण्याचा प्रयत्न असावा.

बलराज संघई, छत्रपती संभाजीनगर 9420015108

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559